# सतेज उर्फ बंटी पाटील

सर्वसामान्य माणूस केंद्रभागी मानुन "मी सर्वसामान्य जनतेचा प्रतिनीधी आहे, ही जनता माझी आहे"अशी भावना मनात ठेवुन समाजकारणासाठी राजकारण करणा-या आमदार सतेज उर्फ वंटी पाटील यांच्या रूपाने करवीरवासीयांना भक्कम युवा नेतृत्व लाभले आहे. देश-विदेशात शिक्षणाची गंगा नेणारे पद्मश्री डॉ. डी.वाय.पाटील यांचे चिरंजीव सतेज पाटील यांचा जन्म १२ एप्रिल १९७२ रोजी कोल्हापुर येथे झाला. १९९५ रोजी विजयकुमार गोविंदराव पाटील यांची सुकन्या प्रतिमा पाटील यांच्याशी झाला.त्यांना तेजस व देवश्री अशी दोन अपत्ये आहेत.

सतेज पाटील यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक जिवनाचा प्रारंभ शिवाजी विद्यापीठाच्या विद्याथी मंडळाच्या निवडणुकीतुन सन१९९२-१९९३मध्ये केला. विद्यार्थी असतानाचा त्यांनी विविध पातळीवरून युवकांना एकत्र करण्याचे काम करून आपली एक जिद्दीसंघटक अशी प्रतिमा निर्माण केली.सतेज पाटील यांची १९९२-१९९३ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाच्या सल्लागार समितीवर तर १९९५-९९ या काळात त्यांचीशिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य म्हणून निवड झाली.

ऑगस्ट २000 मध्ये वयाच्या २७व्या वर्षी पद्मर्षी डॉ.डी.वाय.पाटील सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. सतेज पाटील यांनी आपल्याला राजकीय सामजिक क्षेत्रात उत्तुंग शिखर गाठण्याची महत्वाकांक्षा ठेवली आहे.याचाच परिणाम म्हणून सन २00१ मध्ये झालेल्या कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बॅकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत त्यांनी गगनबावडा तालुकयात संचालक म्हणुन विजय मिळवुन राजकीय जीवनातील महत्वाचे शिखर पादाक्रांत केले.२३ मे २00३ रोजी सतेज पाटील याची पश्चिम महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था मौनी विधापीठाच्या अध्यक्षपदी निवड झाली. राजकीय जीवनात सतेज

पाटील  यांच्या प्रगतीचा आलेख उंचावतअसतानाच त्यांनी ऑक्टोंबर २००४ मध्ये झालेली महाराष्ट्र विधानसभेची निवडणुक करवीर मतदारसंघातुन लढण्याची घोषणा केली .या निवडणुकीतकरवीरच्या जनतेने त्यांना४२ हजारांवरमताधिक्यानेविधानसभेत आमदार म्हणुन पाठवले .मे २००६ मध्ये पुन्हा एकदा जिल्हाबँकेच्या निवडणुकीत व्यक्ती सभासद गटातुन संचालक म्हणुन विजय मिळवला .

"आपल्या मागे काय आहे किंवा पुढे काय आहे या सामान्य गोष्टी आहेत . पण आपल्या आत काय आहे हे सर्वात महत्वाचे आहे"आ . सतेज पाटील यांना हे विधान तंतोतंत लागु पडते .त्यांच्या प्रत्येक कृतीतुन हा आतुन असलेला प्रचंड आत्मविश्वास आणि ध्येयवादाची उर्मी दिसुन येते .सार्वजनिक कामावर निष्ठा ठेवुन प्रलंबित असणा-या कामाची निर्गत सहजपणे करीत करवीर मतदारसंघात  विकासाभिमुख वादक निर्माण करण्यात अल्पावधीतच यशस्वी झालेले व सर्वसामान्यांच्या मनात  आपलेपण निर्माण केलेले युवा नेतृत्व म्हणजे आ . सतेज उर्फ बंटी पाटील होय .

कसबा बावडयातील निवासस्थान, ताराबाईपार्क येथील अजिंकयतारा कार्यालय किंवा नव्याने सुरू केलेले दक्षिण-कोल्हापुर जनसंपर्क कार्यालय यांची दारे जनतेसाठी सदैव खुली असतात . सकाळी ७ वाजल्यापासुन या ठिकाणी मतदारसंघ तसेच जिल्हयातुन दररोज भेटायला येणा-या हजारो लोकांच्या कामाबद्दल तत्काळ निर्णय दिला जातो .स्पष्टवक्तेपणा हा सतेज पाटील यांचा स्थायीभाव आणि निर्भीड गुण असल्यामुळे जे काम अशक्य आहे . त्यासाठी सर्व ताकद पणाला लावण्याची त्यांची तयारी असते .मंत्रालयाच्या पहिल्या मजल्यापासुन सहाव्या मजल्यापर्यत मतदारसंघातील कामासाठी पायात भिंगरी लावुन धावणारे नेतृत्व म्हणजे आ .सतेज पाटील होय . विकासकामाची व कार्यकर्त्याच्या संपर्काची हायटेक यंत्रणा राबविणारे आमदार म्हणुन त्यांची ख्याती झाली आहे .

गेल्या पाच वर्षात त्यांनी करवीर मतदार संघात १४० कोटीहून अधिक रूपयांचा निधी विविध विकास कामांसाठी आणला आहे .पर्यटन   व तिर्थक्षेत्र विकास,रस्ते व ड्रेनेज, शेती, पाणीपुरवठा, समाजकल्याण, कला क्रिडा अशा सर्वच क्षेत्रात भरीव कामगीरी केली आहे .जिल्हा बँकेच्या माध्यमातुन

शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न त्यांनी सोडवले आहेत. संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी भुमीहीन शेतमजुर योजना, श्रावणबाळ निवृत्तिवेतन योजना यासारख्या अनेक शासकीय योजना यशस्वीपणे राबवल्या आहेत.

एकी कडे गल्लीबोळात वाढदिवसाला भपकेबाज स्वरूप येत असताना त्यांनी आपल्या वाढदिवसाला ३ वर्षांपुर्वी सामाजिक जाणिवेचा स्पर्श दिला. दोन ट्रकहून अधिक पुष्पगुच्छ, पुष्पहार त्यातुन होणारे नदीप्रदुषण याबाबींचा विचार करून वहयांच्या स्वरूपात शुभेच्छा द्या अशी हाक त्यांनी आपल्या हितचिंतकांना, कार्यकर्त्यांना दिली. समाजकारणाची पाळेमुळे घट्ट रोवलेल्या करवीरवासीयांची मने त्यामुळे चैतन्यमय झाली आणि लहानांपासुन थोरामोठयांनी त्यांना वहयांच्या स्वरूपाात भरभरून शुभेच्छा दिल्या. गेल्या ३वर्षात ११ लाखांहून अधिक वहया जमा झाल्या व त्यांचा लाभ २ लाख ६६ हजारांहून अधिक गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना झाला. या उपक्रमाचे उभ्या महाराष्ट्राने कौतुक केले. "समाजाला विधायक वळण देणाऱ्याला समाज भक्कम पाठबळ देतो व आपणही तुमच्या समाजकार्यात निश्चित सोबत आहोत हेच दाखवुन देतो." या विधायक उपक्रमाचे महाराष्ट्रातील अनेक लोकप्रतिनिधींना मोठया मनाने अनुकरण केले.

पाचवर्षांपुर्वी गृहिणी महोत्सवाच्या माध्यमातुन व त्यांच्या सुविध पत्नी सौ. प्रतिमा पाटील यांच्या सहभागातुन महिलांच्या सबलीकरणाचा राजमार्ग त्यांनी तयार केला आहे. त्यांनी महिलावर्गाच्या उद्योगशिलतेला गृहिणीमहोत्सवाच्या माध्यमातुन व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत ५ हजारांहून अधिक महिला बचत गटांची स्थापना तसेच २५00 शिबीरातुन २५ हजाराहून अधिक महिलांना विवीध विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सतेज पाटील यांनी डॉ. डी. वाय पाटील कला, क्रिडा, शैक्षणिक व सांस्कृतीक ट्रस्टच्या माध्यमातुन व्यक्तीमत्व विकास शिबीर, मोफत रोगनिदान व शस्त्रक्रिया शिबीर, आदर्श एकत्र कुटूंब पुरस्कार, मंदिर परिसर विकास व जिर्णोध्दार व्यायामशाळा निर्मीती, हॉकी, क्रिकेट आदि स्पर्धांचे आयोजन, विद्यार्थी दत्तक योजना,

गरजु विद्यार्थांना फि मध्ये सवलत ,१०वी, १२वी तसेच विवीध स्पर्धा परिक्षांतुन यशस्वी उमेदवारांचा सत्कार व प्रोत्साहन, २० हजारांहुन अधिक ज्येष्ठ नागरिकांना मोफत ओळखपत्रे वितरण, वृदधाश्रम, पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त, जळीतग्रस्त यांना आर्थीक मदत हे व असे अनेक विविध उपक्रमातुन आपली सामान्यजनांशी असलेली सामाजिक नाळ अधिक घट्ट केलेली आहे.

चौफेर ज्ञान,विलक्षण आकलन शक्ती,अफाट स्मरणशक्ती व प्रचंड लोकसंग्रह हे सतेज पाटील यांच्या कार्यशैलीचे स्वयंभु वैशिष्टे आहे. इंटरनेटच्या माध्यमातुन राज्य,केंद्र शासनाच्या विविध नवीन योजनांची माहिती प्राप्त करून त्या जनतेपर्यंत पोहचवणेसाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. जुन्या गोष्टी जतन करून नव्याची कास धरणारे व दुरदृष्टी,संयम लाभलेले नेतृत्व म्हणुन त्यांचे कतृत्व साकार आहे.

आपल्याला नेमके काय करायचे आहे? कुठे पोहचायचे आहे? याचा दुरदृष्टीतुन विचार करत सतेज पाटील यांनी कलाक्रिडा, शैक्षणिक, सामाजिक महिला, सांस्कृतीक अशा सर्वच क्षेत्रात चौफेर कार्य केले आहे. त्यांच्या या यशस्वी वाटचालीत आई शांतादेवी पाटील यांचे आशिर्वाद, ज्येष्ठ बंधु संजय पाटील यांचे भक्कम पाठबळ व पत्नी सौ. प्रतिमा पाटील यांची अखंड साथ लाभली आहे.

मतदारसंघातील पुनर्रचनमुळे या वेळी ते दक्षिण कोल्हापूर मधुन लढविणारआहेत. नवीनमतदारसंघात नवीन ऋणानुबंध निर्माण करत असतानाच जुन्या कार्यकर्त्यांशी असलेले दृढ नाते कायम ठेवण्याचे कार्य ते करत आहेत. सर्वांना एकत्र घेऊन चांगल्या विचारांची देवाण घेवाण घडवुन समाजात चांगले संस्कार घडविणा-या व तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांच्यात विकासाठी झटणा-या ,करवीरच्या जनतेसाठी जीवाचे रान करणा-या या लाडक्या सतेज नेत्याला जनतेच्या आशिर्वादाने व प्रेमाने यश सतत खुणावत राहील यात तिळमात्र शंका नाही.